MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२५६ | शनिवार दि.०८ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -256 | SATURDAY DT. 08 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## बेलोरा येथे रस्त्याची दुरावस्था

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील बेलुरा ते बेलुरा फाटा या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दूर अवस्था झाली असून या ठिकाणी काल झालेल्या पावसामुळे सर्व रस्ता खरडून खचून गेला आहे त्यामुळे बेलोरा ग्रामस्थांना गावाबाहेर जाण्यासाठी रस्त्याचे दुरावस्था झालेली असून या रस्त्यामुळे गावातील वाहनांना जाण्यासाठी येण्यासाठी खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे अनेक दिवसापासून बेलोरा पासून अर्धा किमी असा हा बेलोरा फाटा रस्ता असून या रस्त्याच्या बाजूने गावातील जेलमिशन पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन टाकण्यात आली आहे या पाईपलाईन मुळे ही या जलमिशन पाणीपुरवठा योजनेच्या गुत्तेदाराने मनमानी करून आबड धोबड व कुठल्याही इस्टिमेट प्रमाणे ये पाईपलाईन बुजवण्याचे काम केलेले नाही त्यामुळे या रस्त्याच्या बाजूने ही पाईपलाईन केलेली आहे त्या पाईपलाईन वर मोठा वळण पडले आहे त्यामुळे अगोदरच खराब असलेला रस्ता व त्यामध्ये झालेले ही पाईप लाईन त्यात आणखीही भर पडल्याने हा रस्ता जाण्यासाठी अगोदरच दहा फुटाचा असून आता तर सहा सात फुटत राहिलेला दिसत आहे व त्यामुळे गावातील ग्रामस्थांना कार जीप टेम्पो ऑटो मोटरसायकल घेऊन येणे जाणे ही कठीण झाली आहे तरी ग्रामपंचायत प्रशासक यांनी जातीने लक्ष देऊन या रस्त्याचा प्रश्न सोडविण्यात यावा अन्यथा लोकशाही मार्गाने सर्व ग्रामस्थ मंडळींना आंदोलन करावे लागेल असा बेलोरा येथील गावातील ग्रामस्थ मंडळींनी इशारा दिला आहे

## पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय मोदीराज यांना

# चक्रीच्या मोदकाचा स्वाद देणारा तो पेठ बीड पोलीस ठाण्याचा बिट अमलदार कोण?

### ऑनलाइन चक्रीचा पेठ बेड परिसरात धुमाकूळ पोलिसांच्या डोळ्याला मोतीबिंदू झाली का?

### बीड शहर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, हद्दीतील ऑनलाईन चक्री बंद

### पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी पोलीस स्टेशन हद्दीत ऑनलाइन चक्री चालू करण्यासाठी पोलीस स्टेशनचे पि आय मोदी राजांना परवानगी दिली आहे का असा सवाल पेठ बीडच्या जनतेतून होत आहे?

### पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी बीड बीड पोलीस स्टेशनच्या गल्लीबोळामध्ये एकदा चक्कर मारणे गरजेचे?

बीड बीड पोलीस स्टेशनचे या अगोदरचे अनेक अधिकारी कर्मचारी यांनी दोन नंबर वाल्या सोबत हात मिळवणे करत आर्थिक तडजोडी मध्ये पेठ बीड ला माफी यांचा अड्डा बनवला आहे. याच माफीया यांनी आता तर चक्क बीड पोलीस यांच्या भिंतीच्या पाठीशी अनेकावे धंद्यासह ऑनलाइन चक्री चालू केली आहे.यामध्ये बाबा चौक, भोई गल्लीतील, एटीएम बाजूच्या गल्लीत, मोमीनपुरा. पोलीस अधीक्षक यांनी जाऊन पाहिले तर नंदकुमार ठाकूर साहेब यांना नक्कीच चक्री चालू आहे का नाही हे कळेल बीड शहरातील बीड शहर व शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व ऑनलाईन चक्रीचे धंदे बंद असताना मोदक खाणारा पोलीस स्टेशनचे पीआय मोदी राज यांचा कर्मचारी कोण आहे याचाही तपास नक्कीच नंदकुमार ठाकूर यांना लागेल.

- मग पेठ बीडचे ऑनलाइन चक्री कोणाच्या आशीर्वादाने चालू आहे पी आय मोदी राजांनी उत्तर द्यावे.
- बीड पोलीस स्टेशनचा बिटामलदार तीस हजार रुपये हप्ता घेतो खरं परंतु मोदी राजांनाही त्याचा हिस्सा किती जातो का ?
- ऑनलाइन चक्रीवाल्यांनी पेठ बीड पोलीस स्टेशनच्या कर्माचाऱ्याच्या हातात पार्ले बिस्किटचा पुडा देऊन समजूत काढतात?

**ऑनलाइन चक्रीचा वेग या पेठ बीड पोलीस ठाण्याच्या पाठीमागे भिंतीला चिटकूनच, मोमीनपुरा, बाबा चौक, भोई गल्लीएटीएम जवळ, चक्रीचा वेग पावसाळा सुरू होताच तापलेलाच.आहे? मोदीराजांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना आपल्या भिंतीच्या पाठीमागे व पेठ बीड हद्दीत चालू आहे. हे माहिती नसेल का असा प्रश्न बीड मधील जनतेला पडलेला आहे.**







बीड प्रतिनिधी - पेठ बीड पोलीस स्टेशन म्हणजे वादाच्या भवऱ्यामध्ये सापडलेला एक पोलीस स्टेशन आहे त्या भवऱ्यावरती अनेक फुलपाखर बसून रसाचा आस्वाद घेतात परंतु त्याच ठिकाणी अनेक दोन नंबर वाले हे गोरगरिबांचा रक्त शोषित करून मासाचे लचके तोडून गोरगरिबांना परिवाराच्या तोंडून घास चोरून स्वतःच्या घशामध्ये माफिया पोलीस स्टेशनच्या आशीर्वादाने घालत आहेत याच माफीयाचेधागेदोरे असलेले व याच माफियांकडून लाचेच्या द्वारे पैसा घेणारे पेठ पोलीस स्टेशनचे अनेक कर्मचारी आपणास पाहायला मिळतील हे मात्र नक्की आहे.पेठ बीड पोलिस स्टेशन हद्दीमध्ये अनेक ठिकाणी कित्येक अवैध धंदे जोर धरत आहेत. पेठ बीड मधील ऑनलाइन चक्री ही कोणाच्या आशीर्वादाने चालू आहे.पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीआय मोदीराज यांनी सांगायला पाहिजे खरंतर बीड शहर व बीड बीडच्या हद्दीमध्ये आणि शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये चक्री चालू ठेवण्याची परवानगी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिली पाहिजे कारण फक्त पेठ बीड पोलीस स्टेशनला वेगळा न्याय आणि बीड शहर पोलीस व शिवाजीनगर पोलीस स्टेशनला वेगळा न्याय का असा सवाल पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना बीडची जनता विचारत आहे?

बीड पेठ पोलीस स्टेशन म्हणजे अवैध धंद्याचे माहेरघरच आहे.? हे फक्त आजच नाही तर अगोदर सुद्धा अनेक वर्षापासून चालूच आहेत. मागील अनेक वर्षात कोणताही पोलीस निरीक्षक या पेठ बीड पोलीस स्टेशनला आला तर पोलीस स्टेशन मार्फत त्या अधिकाऱ्याची आर्थिक तडजोडी मध्ये तोंड बांधण्यासाठी व गप्प राहण्यासाठी त्या ठिकाणी अधिकारी कर्मचारी हे त्या ठिकाणी उपस्थित असतात. अनेक तर राजकीय नेते सामाजिक कार्यकर्त्यांच्या नावावर चालणारे काही पुढारी व अवैध धंद्यावाले ही डायरेक्ट अधिकाऱ्यांशी व राजकीय नेत्यांशी तडजोड करून पोलीस स्टेशनचे तोंड दाबण्याचं काम करून जनतेचा मेहनतीचा पैसा हडप करण्यासाठी काम करत आहेत. तर पेठ बीड पोलीस स्टेशनला फक्त ऑनलाईन चक्री चालू करण्याची परवानगी पोलीस अधीक्षकांनी दिली आहे. का? कारण की बीड शहर व शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये ऑनलाइन चक्रीचे सर्व धंदे बंद करण्यात आलेले असताना मात्र यावेळी फक्त पीठ पोलिसांच्या आशीर्वादाने ऑनलाइन चक्रीचे वादळ चालू आहे हे जुगार गोरगरिबांचे संसार उध्वस्त करत आहेत. पेठ बीड पोलीस स्टेशनचे पि आय मोदीराज पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर हे लक्ष देणार का असा प्रश्न बीडतील जनतेला पडला आहे.

काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यात पोलिसाची प्रतिमा अतिशय मलीन झाली आहे बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर हे खूप चांगल्या प्रकारची सेवा बीड जिल्ह्यातील जनतेला देत आहेत सध्याच्या राजकीय वातावरणामुळे जातीवाद वाढला असताना सुद्धा बीड ते पोलीस अधीक्षक स्वतः प्रत्येक गावामध्ये जाऊन शांततेचे आवाहन करत असताना या ठिकाणी बीड शहरातील बीड पोलीस स्टेशनचे पीआय मोदी राज यांच्या पेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये आवेदन त्यांनी दूर धरलेला आहे यावेळी सुद्धा अनेक पोलीस कर्मचाऱ्यांसह मोठमोठे अधिकारी बीडच्या लातलुचपत प्रतिबंधक कार्यालयामार्फत लाथ घेताना पकडून गीर बंद करण्यात आलेले आहेत परंतु बीड पोलिसांचा धंदा हा दोन नंबर वाल्यांच्या जीवावरती चालला आहे बीड बीडला जाण्यासाठी राजकीय वरद हस्त लाभलेले कर्मचारी व आर्थिक तर जोडीमध्ये पेडमिळ पोलीस स्टेशन मागणाऱ्या कर्मचाऱ्यांना लाज स्वीकारणे म्हणजे ही एक पार्ले बिस्कीट च्या पुढे सारखी गत पोलीस कर्मचाऱ्यांची झालेली आहे यामुळे बीड जिल्ह्यातील अवैध धंद्यांना जोर जोर लागला आहे भेट बीड भागांमध्ये अनेक अवैद्य धंदे असतानाच पेठ बीड पोलिसांनी ऑनलाइन छत्री ही कोणाच्या आशीर्वादाने चालू आहे हे सांगावे तर या ठिकाणी ऑनलाइन चक्रीच्या माध्यमातून लाख रुपयाची उलाढाल होत असताना याचा मलिदा सुद्धा अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना जात आहे याकडे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी लक्ष देणे गरजेचे आहे तर यावेळी मात्र बीडमध्येच फक्त चक्री चालू आहे म्हणून ऐकायला व पाहायला मिळत आहे तर बीड शहर व शिवाजीनगरच्या हळदीमध्ये चक्री का चालू नाही असा प्रश्न पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकरे यांना बीडची जनता विचारल्याशिवाय राहणार नाही तर यावेळी मात्र याच चक्रीवर पेड बीड पोलीस किंवा एस पी साहेबांचे विशेष पथक किंवा एलसीबी चे संतोष साबळे यांना कारवाईचे आदेश मात्र यावेळी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी देणे गरजेचे आहे व गोरगरिबांचा हिसाब आपल्यापासून या ठिकाणी गोरगरिबांच्या परिवारातील लहान मुलं माता-भगिनी एस पी नंदकुमार ठाकूर यांच्याकडे अपेक्षेनं पाहत आहेत

# माजलगाव नगरपरिषद कार्यालयातील मुतारीत मिळतोय जिवंतपणी 'नरका'चा अनुभव

### शासन तर नाहीतच, प्रशासक सुद्धा घेतात बघायची भूमिका

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील मध्यवर्ती भागामध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या नगर परिषदेच्या प्रशासकीय कार्यालयात असलेली मुतारी सर्वसामान्य जनतेसाठी सुद्धा आहे. परिसरातील बाजारपेठेत व्यावसायिक आणि ग्राहकांना मूत्रविसर्जनासाठी नगरपरिषदे कडून असलेली एकमेव व्यवस्था आहे. बाजूच्या बाजारपेठेतील व्यावसायिक आणि ग्राहकांना पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे आहे तशा परिस्थितीत मुत्रविसर्जन करावे लागते.सदरील मुतारीत पाण्याचे नळ तुटलेले आहेत, मूत्रविसर्जनाचे भांडे फुटलेले आहेत, नाल्या स्वच्छते अभावी भरून वाहत आहेत, बेसिनचे भांडे तुटलेले आहे, दोन्ही संडास मधील भांड्यात मैला तसाच आहे, भिंतीवर आक्षेपार्ह मजकूर लिहिले आहेत. या नगरपरिषदेच्याच पार्किंग मध्ये शहरातील आणि परिसरातील अनेक टवाळखोर पोरं रात्री अपरात्री गप्पा मारताना दिसून येतात तिथेच सिगारेट, दारू इत्यादींचे सेवन करताना नागरिक रोजच पाहतात, अनेक वेळा दुकानात उशिरापर्यंत काम करणाऱ्या कारागिरांना व्यापाऱ्यांना नगरपरिषद प्रशासकीय इमारतीमध्ये मूत्रविसर्जनासाठी जाताना या टवाळखोर टोळीच्या दहशतीखाली जावे लागते पार्किंग परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे असूनही अनेक वेळा मुतारीत दारूंच्या बाटल्याचा खच पहावयास मिळतो असे तेथील नागरिकांनी सांगितले, एवढेच कमी काय तर नगरपरिषद प्रशासनाकडून मुतारीस काट्यांचा वेढा देण्यात आलेला आहे त्यामुळे मुतारी मध्ये जाणाऱ्या सामान्य नागरिकांना व व्यवसायिकांना आपण खरंच नरकामध्ये आहोत की काय असा भास होणे स्वाभाविक आहे. नगरपरिषद प्रशासनाकडे मात्र या समस्या कडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही किंवा जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. नगरसेवक फक्त आपल्याकडे मत मागण्यासाठी येतात, नागरी सुविधा सोडवण्यासाठी त्यांना वेळ नाही यापूर्वीही अनेक तोंडी तक्रारी अधिकाऱ्याकडे करण्यात आल्या परंतु उपाययोजना शून्य असा आरोप येथील नागरिकांनी व्यापाऱ्यांनी केला आहे सदरील व्यवस्थेमध्ये महिलांसाठी तर स्थानच नाही.

यापूर्वी नगर परिषदेस स्वच्छता मोहिमे अंतर्गत बक्षीसही प्राप्त झाले होते शहरांमध्ये बड्या नायक-नायकांच्या स्वच्छता संदेश देणाऱ्या मिरवणुका सुद्धा निघाल्या होत्या, 'स्वच्छ माजलगाव सुंदर माजलगाव' ही दिलेली घोषणा प्रशासनाकडूनच धुळीस मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते आहे. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे या विरोधात २०१८ साली राज्य शासनाने नगरपरिषद नगरपालिका व ग्रामपंचायतींना




विशेष अधिकार प्रदान केले होते यामध्ये प्रवर्ग आणि ब नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात रस्त्यावर घाण केल्यास १५० रुपये दंड, सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास १०० रुपये दंड, उघड्यावर लघुशंका केल्यास २०० रुपये दंड तर उघड्यावर शौच केल्यास ५०० रुपये दंडाची आकारणी मुख्याधिकारी करू शकतात अशी त्यामध्ये तरतूद होती परंतु त्या अधिकाराचा कसलाच वापर या वर्षात अद्याप पर्यंत झाल्याचे दिसून आले नाही या अधिकाराचा एक महिना जरी नगरपरिषद प्रशासनाने वापर केला तर नगर परिषदेस लाखो रुपयाचा महसूल जमा होईल अशी स्थानिक व्यापारी आणि रहिवाशांमध्ये चर्चा आहे.

# कै रामभाऊ अण्णा खाडे अध्यापक विद्यालयात भावी गुरुजींची परीक्षा सुरळीत सुरु

दिंद्रुड (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शासकीय अध्यापक विद्यालया अंतर्गत आंबेजोगाई व माजलगाव तालुक्यातील अध्यापक विद्यालयाची भावी गुरुजींची परीक्षा दिंद्रुड येथील कै रामभाऊ अण्णा खाडे अध्यापक विद्यालय परीक्षा केंद्रावर सोनाजीराव प्राध्यापक विद्यालय माजलगाव, शकुंत हरीश अध्यापक विद्यालय केंद्रेवाडी, बाळासाहेब लहाने अध्यापक विद्यालय आंबेजोगाई ह्या अध्यापक विद्यालयातील भावी गुरुजींची परीक्षा दिनांक ६ जून २०२४ ते १४ जून २०२४ या कालावधीमध्ये चालू आहेत भावी गुरुजी म्हणून प्रथम वर्षाला १२१ व द्वितीय वर्षाला १४२ भावी गुरुजी परीक्षा देत आहेत. परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक म्हणून. श्री महामुनी आर व्ही, पर्यवेक्षक म्हणून श्री कुरे आर ए,श्री.पोटभरे एल बी, श्रीमती कदम ए एच, श्री सिद्धीकी ए जी, श्री मोती एस एल, श्री पवार व्ही बी, श्री वैरागे व्ही टी, व कै रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे, कै रामभाऊ अण्णा खाडे अध्यापक विद्यालयाचे श्री विलासजी खाडे सर व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व कर्मचारी



परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडत आहेत.कै.रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील विध्यार्थी यांची गैरसोय होऊ नये म्हणून दिंद्रुड येथील परीक्षा केंद्र मंजूर करून गेल्या १८ वर्षपासून याठिकाणीच्या परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडत आहेत.

# तीन हजारांची लाच घेताना मुख्याध्यापकाला एसीबीने रंगेहाथ पकडले!

## या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ

### सततच्या लाचखोरीच्या घटनेनं लाचखोरांचा जिल्हा अशी बीड जिल्ह्याची ओळख निर्माण होऊ लागली?

गेवराई । प्रतिनिधी

शाळा दाखल्याची दुय्यम प्रत देण्यासाठी तीन हजारांची लाच स्वीकारताना एका खाजगी शिक्षण संस्थेच्या शाळेच्या मुख्याध्यापकास शुक्रवार (ता.०७) रोजी बीड एसीबीने कारवाई करत रंगेहाथ पकडल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. केज शहरातील खासदार रजनी पाटील यांच्या खाजगी शिक्षण संस्थेच्या रामराव पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक धनराज सोनवणे यांनी शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची दुय्यम प्रत देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांकडे तीन हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याबाबत सदरील विद्यार्थ्यांकडून तक्रार प्राप्त




झाल्यानंतर बीड एसीबीने सापळा लावला आणि तीन हजाराची लाच स्वीकारताना मुख्याध्यापकास रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईने तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे लाचखोर मुख्याध्यापकांची सेवावृत्ती ही दोन-अडीच वर्षावर आलेली आहे. ही कारवाई बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधिक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनूस शेख, श्रीराम गिराम यांनी केली आहे. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सातत्याने लाचखोरीच्या घटना उघडकीस येत असल्याने सध्यातरी लाचखोरांचा जिल्हा अशी बीड जिल्ह्याची ओळख निर्माण होताना दिसून येत आहे.



बीड शहर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना समाजसेवक शेख पशा भाई व पठाण अमर जान छायाचित्र दिसत आहे.

# पोखरी (घाट) येथील ऊसतोड मजूर दाम्पत्याच्या घराची भिंत वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने कोसळली

आर्थिक मदतीची मागणी :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील मौजे.पोखरी(घाट) येथील भोसले दलित वस्ती मधील ऊसतोड मजुर दांपत्य जनार्दन भगवान भोसले व शिल्पा जनार्दन भोसले यांच्या रहात्या घराची मागीलबाजुची भिंत दि.१३ गुरुवार रोजी मध्यरात्री वादळीवाऱ्यासह आलेल्या पावसाने कोसळली. जनार्दन भोसले यांच्या म्हणण्यानुसार रात्री १ च्या सुमारास अचानक कडकडाट झाला आणि आवाज झाला.घराच्या पत्र्यावरील दगड कोसळले.घरात आम्ही दोघे नवराबायको व मुलगा शंतनु आणि



मुलगी सोनाली झोपलेलो होतो. सुदैवाने आम्हाला दुखापत झाली नाही.काल संपूर्ण दिवसभरात महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी, तलाठी कोणीही पाहणी करण्यासाठी आलेले नाही.आम्ही ऊसतोड मजुर असुन आमची आजच पावसाळ्यात राहण्याची पंचायत झाली असुन भिंत बांधून घेण्यासाठी जवळपास दिड लाख रूपये खर्च बांधकाम मिस्त्री यांनी सांगितला आहे. प्रशासनाने आम्हाला आर्थिक मदत करावी.पोखरी (घाट) येथील भोसले दलित वस्ती मधील ऊसतोड मजूर दाम्पत्याच्या घराची वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाने पडझड झाली असुन तहसिल प्रशासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत करावी अशी विनंती तहसीलदार सुहास हजारे,मंडळ अधिकारी अशोक डरपे आणि तलाठी गणपत पोतदार यांच्याशी फोनवरून संपर्क साधत केली आहे. मंडळ अधिकारी, तलाठी यांनी पंचनामा करून मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

# आपला सामाजिक सलोखा आणि सौहार्द जपायची जबाबदारी प्रत्येक जिल्हावासीयांची - धनंजय मुंडेंचे बीड जिल्हावासीयांना आवाहन

## निवडणुकीत जय-पराजय होत असतात; सोशल मीडियावर वातावरण दूषित करू नये - धनंजय मुंडे

## महायुती व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना देखील धनंजय मुंडे यांचे शांततेचे आवाहन

मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात लोकसभा निवडणूक अत्यंत वेगळ्या वळणावर व अनेक मुद्द्यांनी गाजून पार पडली. अतिशय वेगळ्या वातावरणात झालेल्या या निवडणुकीत झालेला पराजय आम्ही मोकळ्या मनाने स्वीकारला; विजयी उमेदवाराचे अभिनंदन सुद्धा केले. मात्र अजूनही सोशल मीडियावर जातीवाचक व विविध नेत्यांची अवहेलना करणाऱ्या पोस्ट केल्या जात असून याद्वारे सामाजिक सलोखा बिघडून आपसातील द्वेष व तणाव वाढत आहे. त्यामुळे आपला सामाजिक सलोखा व सौहार्द जपण्याची जबाबदारी आता प्रत्येक बीड जिल्हा वासीयांची आहे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज व्हीडिओ संदेशद्वारे केले आहे.

क्या हार मे, क्या जीत में, किंचित नही भयभीत मै। स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या या कवितेप्रमाणे मी व पंकजाताईंनी अत्यंत जिव्हारी लागणारा हा पराभव मान्य केला आहे. लोकशाहीमध्ये जनतेचा कौल हा महत्त्वाचा असतो आणि तो कौल आपण मान्य करून विजयी उमेदवारास शुभेच्छा देखील दिलेल्या आहेत.



मात्र सोशल मीडियावर अजूनही आमच्यासारख्या नेत्यांचे फोटो आणि बनावट व्हिडिओ पोस्ट करून वातावरण दूषित केले जात आहे अत्यंत खालच्या भाषेत राजकीय नेत्यांवर टीका करणाऱ्या पोस्ट तसेच जाती-जातीत तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्या जात आहेत. महायुती व महाविकास आघाडीच्या दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांना माझी विंनंती आहे, की हे आता थांबलं पाहिजे. असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे. मी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री असल्याने नियमानुसार मतमोजणी प्रक्रियेत किंवा मतमोजणी केंद्राच्या जवळपास सुद्धा उपस्थित नसताना मी बंदूक काढली किंवा कोणाला मारहाण केली अशा पद्धतीच्या खोट्या पोस्ट जाणीवपूर्वक पेरल्या जात आहेत. या गोष्टीत अजिबात तथ्य नसून या गोष्टी पूर्णपणे खोटारड्या व जाणीवपूर्वक बदनामी करणाऱ्या आहेत. अशा गोष्टी पेरल्याने काय साध्य होणार आहे, असा प्रश्नही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे.

३५० वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला १८ पगड जातींना एकत्र घेऊन गावगाडा चालवायची शिकवण दिली, आज त्या शिकवणी पासून परावृत्त न होता, आपला गावगाडा व आपली सामाजिक एकतेची परंपरा अबाधित ठेवणे हे सर्व जिल्हा वासीयांचे आद्य कर्तव्य असल्याचेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या कृषी दुकानदारांवर कार्यवाही करावी

## शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

सध्या खरीप हंगाम जोरदार सुरू आसुन, लागवडीयोग्य पाऊस झाल्याने बळीराजा सुखावला आसुन सध्या पेरणी व बियाणे लागवड मोठ्या प्रमाणात सुरू झालेली असून सध्या शेतकऱ्यांना बियाणे लागत आहे... परंतु कृषी दुकानदार खते व बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचे व चढ्या भावाने बियाणे विक्री करण्याचे काम करत आहेत... परंतु त्याबाबतीत आम्ही जिल्हा अधीकारी व जिल्हा कृषी आधीकारी यांच्याकडे सतत पाठपुरावा केला असून, त्यांनीं पण सांगितले आहे की अशाप्रकारे कोणी कृषी दुकानदार कृत्रिम टंचाई निर्माण करत आसेल व चढ्या भावाने विक्री करत आसेल तर आमच्याशी संपर्क करा त्या दुकानदाराचा कृषी परवाना रद्द करून त्यावर दडात्मक कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.त्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी खते व बियाण्यांच्या बाबतीत डायरेक्ट शिवसेना जनसंपर्क कार्यालयांशी संपर्क साधून कोणी



कृषी दुकानदार आपली फसवणूक करत आसेल तर कळवावे आशा दुकानदारांस आम्ही शिवसेना स्टाईलने वठणीवर आणू असा खणखणीत इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी दिला आहे..

बीड जिल्ह्यामध्ये बोगस बियाणे, कृत्रिम बियाणे खते टंचाई, मोठ्या प्रमाणात बियाण्यांच्या अवैध साठा करून चढ्या भावाने बियाणे विक्री करणाऱ्या कृषी विक्रेत्यांची यापुढे गय केली जाणार नाही तर बीड जिल्हा शिवसेना शेतकऱ्यांच्या मदतीला धावून येऊन कृषी विक्रेत्यांना धडा शिकवेल.

# विपरीत परिस्थितीतील निवडणूकीत शेवटपर्यंत दिला लढा

**परळी (प्रतिनिधी)**

**बीड लोकसभा निवडणुकीत उमेदवार म्हणून पक्षादेश येताच सर्वशक्तीनिशी रणांगणात उतरलेल्या पंकजाताई मुंडे या रणरागिणीने अतिशय विपरीत परिस्थितीतील निवडणुकीतही अखेरपर्यंत खंबीर लढा दिला. निसटता पराभव झाला असला तरी संपूर्ण महाराष्ट्रात व राजकीय क्षेत्रात दिलेल्या या लढ्याला वाखाणण्यात येत आहे. आज दिल्लीत देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही पंकजाताई मुंडे यांना बळ देत त्यांची पाठ थोपटली.**

महाराष्ट्राच्या राजकारणातील बीडची लोकसभा निवडणूक प्रचंड लक्षवेधी ठरली. भाजपच्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)



पक्षाच्या बजरंग सोनवणे यांच्या लढतीमुळे. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यापासून मतमोजणीच्या शेवटच्या फेरीपर्यंत ही निवडणूक साऱ्यांच्या नजरा खेचून घेणारी राहिली. हीनिवडणूकसोपी नक्कीच नव्हती. मात्र, एवढ्या चुरशीच्या निवडणूकीतही पंकजाताई मुंडेंनी सन्माजनक मते खेचून आणली.प्रतिस्पर्धी उमेदवाराचा निसटता विजय झाला. दरम्यान, आज दिल्लीत एनडीए संसदीय पक्षाची बैठक होती.या बैठकीस पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या. यावेळी भाजप व एनडीएतील बहुतांश सर्वच नेत्यांनी बीडच्या निवडणुकीत पंकजाताई मुंडेंनी अतिशय कठीण व विपरीत परिस्थितीतही मोठा लढा दिला याची वाखाणणी केली.एवढेच नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्यासाठी पंकजाताई मुंडे जेव्हा गेल्या त्यावेळी मोदींनी आशिर्वाद देत त्यांची पाठ थोपटली.

## पंकजाताई मुंडेंच्या पाठीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींची कौतुकाची थाप !

# पाचवीला शिवचरित्र आणि शस्त्र पूजन करून मुलांचे जन्माचे स्वागत..

## बादाडे परिवाराचा मराठा बहूजन समाजाला एक नवीन आदर्श..

बीड (प्रतिनिधी)

आपल्या महाराष्ट्राला एक वैचारिक वारसा आहे. याच मातीत अनेक संत महापुरुष होऊन गेले त्यांनी समाजासाठी अनेक आदर्श विचार दिले. याचाच प्रत्यय म्हणजे पुण्यातील समिक्षा संतोष बादाडे यांना मुलगा झाल्यानंतर त्यांच्या जन्माचे स्वागत, मुलांच्या पाचवीच्या कार्यक्रमात कोणतेही कर्मकांड न करता, जगद्गुरू तुकोबाराय राजमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमाचे पूजन करून तसेच शिवचरित्र व शस्त्र पूजन करण्यात आले. जर तुम्हांला स्वतः ची भावी पिढी उत्कृष्ट शिक्षित, विज्ञाननिष्ठ परिवर्तनवादी वैचारिक विचारांची व्हावी असे वाटत असेल तर तुम्हांला स्वतःच्या घरात अंधश्रध्दा, कर्मकांड यावर मात करून विज्ञानवादी विचार समाजात रुजवण्याचे



काम नवीन पिढीला करावे लागेल..

०३ जून २०२४ सोमवारी या दिवशी मुलांचा जन्म झाला आणि ०७ जूनला पाचवी पूजन असल्यामुळे घरी जिजाऊ वंदना घेऊन शस्त्र व शिवचरित्राचे पूजन केले आणि बाळाचे नामकर केले, शंभू हे नाव ठेवले. बादाडे पाटील परीवार हा तुकोबाराय शिव फुले शाहू आंबेडकर आण्णाभाऊ आणि शहिद भगतसिंग विचारांचा आहे. बादाडे परिवार हा विचार आणि कृतीचा सांगड घालणारा वैचारिक विचारांचा आहे. जर समाज परिवर्तन घडवायचे असेल तर स्वतःच्या घरापासून सुरूवात करायला पाहिजे. म्हणून हा उपक्रम नक्कीच येणाऱ्या पिढीला नवीन दिशा देण्याचे काम करेल. समाजात विचार उगवण्याची चिंता करण्यापेक्षा पेरणीला सुरूवात करा, एक दिवस तुमच्या वैचारिक विचारांच्या शेतात उगवलेल धान्य लोक पेरण्यासाठी नक्कीच घेऊन जातील. हाच विचार घेऊन बादाडे कुटूंब पुढे जात आहे. आणि मराठा बहूजन समाजाला एक नवीन आदर्श घालून देण्याचे काम बादाडे परीवाराकडून घडत आहे. त्यांच्या या उपक्रमाचे महाराष्ट्रभरातून कौतूक होत आहे

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची नुतन कार्यकारिणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची २०२४-२०२५ या नविन वर्षासाठी नुतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. यात अध्यक्ष-कल्याण काळे, उपाध्यक्ष-अजित देशमुख, सचिव- धनराज सोळंकी, सहकोषाध्यक्ष -महेश सारडा,कोषाध्यक्ष सचिन बेंबडे तर कार्यकारीणी सदस्य म्हणून स्वप्नील परदेशी सल्लागार म्हणून संतोष मोहिते तर कार्यकारीणी सदस्य म्हणून डॉ.अनिल केंद्रे, प्रदिप झरकर,मोईन शेख,बालासाहेब कदम, डॉ.नवनाथ घुगे,गोपाळ पारीख,ओमकेश दहिफळे,मंजूषा जोशी, सुनंदा मुंदडा, गणेश राक्षत, डॉ.निशिकांत पाचेगावकर, ॲड.अनिल लोमटे,शेख शकील,स्वरूपा कुलकर्णी,बालाप्रसाद चोकडा,डॉ.सुरेश आरसुडे,राजेंद्र घोडके, प्रा.रमेश सोनवळकर, पुरूषोत्तम रांदड, बालासाहेब लोमटे, सुरेश मोदी,प्रा.रोहिणी पाठक यांची निवड करण्यात आली आहे.

रोटरी क्लबच्या माध्यमातून आगामी काळात सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वंचितांसाठी, दिव्यांगासाठी व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार असल्याचे रोटरीचे सचिव धनराज सोळंकी यांनी सांगितले.रोटरी क्लबच्या या नुतन पदाधिकार्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.



बीड शहर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांना बीडशहर शांतता कमिटी च्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना समाजसेवक मुसा खान,ऍड.महेश धांडे,सागर जवकर, निलेश वाघ,सुमित धांडे,शैलेश चव्हाण व इतर

# नाट्य परिषदेच्या जागर एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीडची नवस एकांकिका प्रथम

प्रतिनिधी । बीड

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या नाट्य संमेलनानिमित्त जागर नाट्य कलेचा या उपक्रमाअंतर्गत झालेल्या एकांकिका स्पर्धेत पाडळी येथील प्रगती सेवाभावी संस्थेची संतोष पैठणे लिखित एकांकिका नवस महाराष्ट्रातून सहा पारितोषिकासह सर्वोत्कृष्ट ठरली आहे. जागर करंडक, दोन लाख रुपये रोख व प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखेच्या माध्यमातून व प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक फेरी बीड येथे पार पडली.

बीड केंद्रावरून प्रथम आलेली नवस ही एकांकिका उपांत्य फेरीतून अंतिम फेरीत गेली होती. तब्बल साडेचारशे एकांकिकेतून उपांत्य फेरीला २७ एकांकिका आणि त्यातून अंतिम फेरीला ९ एकांकिका सादर झाल्या. विजय केंकरे यांनी बीडमध्ये चार दिवस येवून या एकांकिकेचे पालकत्व स्वीकारले होते. सुबोध भावे, मुक्ता बर्वे, विश्वास सोहनी, सतीश राजवाडे, डॉ.अनिल बांदवडेकर असे दिग्गज प्रेक्षकांच्या माध्यमातून परीक्षण झाले. विजेत्यांना रोहिणी हट्टंगडी, पुरुषोत्तम बेर्डे, विजय केंकरे, कुमार सोहणी, सतीश लोटके, सुनील ढगे, सर्व परीक्षक, संदीप जंगम, विजय सूर्यवंशी, संजय पाटील देवळाणकर, शिवाजी शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. नवस एकांकिकेला लेखन उत्तेजनार्थ - संतोष पैठणी, दिग्दर्शन प्रथम -संतोष पैठणी, पुरुष अभिनय प्रथम -विठ्ठल जोगदंड, स्त्री अभिनय तृतीय -अंकुर तांगडे स्त्री अभिनय उत्तेजनार्थ -मानसी जाधव व सर्वोत्कृष्ट संघ असे एकूण सहा पारितोषिके मिळाली. बीड नाट्य परिषदेच्या माध्यमातून १०० व्या नाट्य संमेलनानिमित्त नाट्य जागर स्पर्धा झाल्या. त्यातून बीड विभागातून प्रथम आलेली एकांकिका शेवटपर्यंत प्रथमच राहील, मुंबईच्या अंतिम स्पर्धेसाठी ९ एकांकिकेतून महाराष्ट्रातून प्रथम येण्याचा मान बीड जिल्ह्याला मिळाला. या एकांकिकेत संतोष पैठणे, अंकुर तांगडे, विठ्ठल जोगदंड, मानसी जाधव, ऋषिकेश रत्नपारखी, अमोल गायकवाड, शितल चव्हाण, स्नेहा वरकटे, रोहित पुराणीक, शुभम चव्हाण, शाहरुख मिर्झा, सचिन पंडित, भूषण ढोबळे, गणेश भोसले, सोनाली मजमुले, आर्या दोडके यांनी भूमिका केल्या. तर प्रकाश योजना - अक्षय फुलझळके, अशोक घोलप, संगीत -अशोक थोरात, पवन शिंदे, नेपथ्य - संतोष पैठणे, लक्ष्मीकांत दोडके, रंगभूषा- खंदारे, वेशभूषा- लक्ष्मीकांत दोडके, रंगमंच व्यवस्था- वेद निकम, शुभम खरे, अशोक काळेगावकर, संकेत बोंद्रे, निलेश माळी या यशामध्ये संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर, बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपाताई क्षीरसागर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. के.एस.के.महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाने तांत्रिक मदत केली. या एकांकिकेत के.एस.के. महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाचे आजी-माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या यशाबद्दल नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, कार्यवाह - अजित भुरे, उपाध्यक्ष- भाऊसाहेब भोईर, नरेश गडेकर, सहकार्यवाह- दिलीप कोरके, समीर इंदलकर, कार्यकारणी सदस्य, डॉ.दीपाताई क्षीरसागर, सविता मालपेकर, दीपक रेंगे, विशाल शिंगाडे सह सर्व नियमक मंडळ सदस्य, प्रगती सेवाभावी संस्थेचे गणेश अवंतकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य तथा नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील देवळाणकर, डॉ. दुष्यंता रामटेके, प्रा. विजय राख, डॉ. रुक्मिणीकांत पांडव महाविद्यालयाचे सर्व पदाधिकारी, नाट्य परिषदेचे सर्व सदस्य, नाट्य रसिकांनी अभिनंदन केले.



# सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारा युवकनेता मसू भाऊ जाधव

नाळवंडी (प्रतिनिधी)

एका आयुष्यात एक भूमिका पार पाडत असताना माणसाला असंख्य अडचणी येतात, व माणूस निराश होतो थकून जातो परंतु या उलट आयुष्यात एकाहून अधिक भूमिका अगदी चोखपणे पार पाडत असताना आनंदी व उत्साही आयुष्य जगत असणारा नाळवंडी गावचा भूमिपुत्र,आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज,अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारा युवक नेता मसू भाऊ जाधव यांचा आज जन्मदिवस त्या निमित्ताने त्यांच्या आयुष्यावर चार ओळी लिहिण्याचा मोह आवरता येणार नाही.




ऊसतोड मजुराच्या कुटुंबात जन्माला आलेला बालपणापासून माझा सवंगडी असलेला माझा भावा सारखा मित्र नाळवंडी सारख्या छोट्या गावातील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच संगमेश्वर विद्यालय नाळवंडी,तुलशी महाविद्यालय बीड मधून प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन समाजकारण करता करता राजकारणात येतो आणि पाठीवर कोणाचाही हात नसताना स्वतःच एक वेगळ अस्तित्व निर्माण करतो या गोष्टीचा एक भाऊ म्हणून मला त्याचा अभिमान वाटतो.आज तो स्वतःच्या कर्तुत्वावर वेगवेगळ्या क्षेत्रात उतुंग भरारी घेतोय,कोणत्याही पक्षात नसताना सर्वसामान्यांचा आवाज बुलंद करण्याचे काम करतोय, अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम करतोय ही गोष्ट अभिमानास्पद आहे,वेगवेगळ्या मंचावर समाज प्रबोधनाचे काम करतोय असंख्य समस्यांना तोंड देत समाजाचे काम करतो एवढ्या मोठ्या जबाबदाऱ्या कसा पार पाडत असेल असा प्रश्न मला सातत्याने पडत असतो कधी कधी त्याच्याकडे पाहून, त्याचा संघर्ष पाहून मलाही त्याच्या जिद्दीचा आणि चिकाटीचा हेवा वाटतो,आपल्या समाजाचं आपण काही तरी देणं लागतो,समाज मोठा झाला पाहिजे,समाज एक झाला पाहिजे,समाजाच्या अडीअडचणी दूर झाल्या पाहिजे,ही नितीमत्ता डोळ्या समोर ठेऊन समाजासाठी झटायच हे आम्ही बघत आहोत,माझा भाऊ सगळ्या बाबतीत चांगला आहे परंतु चांगुलपणाने त्याला होणारा त्रास हा देखील एक भाऊ म्हणून मला जाणवतो,एक सर्वसामान्य माणसाला एवढे सगळे काम करत असताना अडचणी येतात तशा अडचणी माझ्या भावाला येतात परंतु त्या अडचणीवर मात करून तो यशाच्या दिशेने मार्गक्रमण करतो आहे,येणाऱ्या काळामध्ये तो ज्या भूमिका घेईल त्या सर्व भूमिकेमध्ये भाऊ म्हणून मी आणि आपला सर्व मित्र परिवार तुमच्यासोबत ताकतीने उभे राहू असा विश्वास मी तुम्हाला तुमच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लिहिलेल्या लेखातून देऊ इच्छितो, माझ्या मोठ्या भावाच्या आयुष्यात भरभराट येवो,ईश्वर तुम्हाला चांगल आरोग्य व दीर्घायुष्य देवो हीच एक प्रार्थना करतो,भाऊ पुन्हा एकदा तुम्हाला जन्मदिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

# केज शहरातील एका नामांकित विद्यालयाच्या मुख्याध्यापकास तीन हजाराची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले

## बीड एसीबीची धडाकेबाज कारवाई;केज मध्ये दहा दिवसात दोन कारवाया

केज (प्रतिनिधी)

केज शहरातील एका नामांकित विद्यालयाच्या मुख्याध्यापकास तीन हजाराची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले असून बीड एसीबीने धडाकेबाज कारवाई केली.केज मध्ये दहा दिवसात ही दुसरी कारवाई झाली आहे.या बाबतची खात्रीलायक सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की,एका विद्यार्थ्याला (टी.सी.) शाळा सोडण्याचा दाखल्याची दुय्यम प्रत देण्यासाठी केज शहरा तील एका नामांकित विद्यालयाचामुख्याध्यापक धनराज सखाराम सोनवणे याने तीन हजार रुपये लाचेचीची मागणी केली होती परंतु विद्यार्थ्याला मुख्याध्यापक धनराज सोनवणे याला लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.सदर तक्रार प्राप्त होताच एसीबीने तक्रारीची शहानिशा करून दिनांक ७ जून २०२४ रोजी बीड च्या लाचलुचपत विभागा च्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सापळारचून तीन हजार रुपयाची लाच स्वीकारतानामुख्याध्यापक धनराज सोनवणे रंगेहात पकडले आहे.गेल्याअनेक दिवसापासून बीड जिल्ह्या मध्ये लाचखोरीच्या घटना पाहावयास मिळत होत्या. परंतु केज मध्ये




गेल्या दहा दिवसापासून दोन घटना घडल्या आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यासह केज तालुक्यात लाचखोरीची खळबळ जनक घटना उघडकीस येत आहेत. सदर कारवाई लाचलुपत प्रतिबंधक बीड विभागाचे पोलीस उप अधिक्षक श्री. शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनूस शेख, श्रीराम गिराम यांच्यासह कर्मचाऱ्यांनी केली आहे. सदर प्रकरणी केज पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरा पर्यंत चालू होती.

# विद्यार्थ्यांनी पालकांचा सल्ला घेऊनच करिअर घडवावे : दीपा मुधोळ-मुंडे

## व्यापारी महासंघ आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमात प्रतिपादन

**बीड ।प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांनी करिअरबाबत निर्णय घेतांना पालकांचा सल्ला घ्यायलाच हवा. त्यांच्या उज्वल भविष्यासाठी पालक योग्य ते मार्गदर्शन करु शकतात असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले. जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने विशेष प्रावीण्य मिळवून पास होणार्या १० वी तसेच १२ वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रारंभी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.**




सर्वप्रथम नुकत्याच पार पडलेल्या अतिसंवेदनशील अश्या बीड लोकसभा मतदार संघात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ तसेच बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर ज्यांनी सायबर सेलच्या माध्यमातून नियंत्रण ठेऊन सामाजिक सलोखा व कायदा सुव्यवस्था उत्कृष्ट राखली याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. सर्व व्यापारी,पालक,विद्यार्थी यांनी जोरदार टाळ्या वाजवून प्रशासनाचे अभिनंदन केले. त्यानंतर उपस्थित गुणवंत विद्यार्थी, पालक यांचा स्मृतिचिन्ह, पेन देऊन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते तसेच व्यापारी महासंघ पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी मुधोळ-मुंडे यांनी त्यांचा स्वतः चा दहावी पासून इथ पर्यंतचा प्रवास कसा झाला, विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, पालकांच्या सल्ल्यानेच करिअर निवडावे, काय करायचे याचे ध्येय निश्चित करावे त्यानुसार अभ्यास केला तर तुम्ही यशस्वी होणारच असा विश्वास दिला व बहुमूल्य असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन राजेंद्र मुनोत यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.अक्षता शेटे हिने केले. या कार्यक्रमास मराठवाडा व्यापारी चेंबर चे सचिव श्री.वाय.जनार्दन राव, बीड जिल्हा व्यापारी महासंघ अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक शेटे, सचिव तुकाराम साळुंके, शहर अध्यक्ष प्रकाश कानगावकर,तालुका अध्यक्ष राजेंद्र बन्सोडे, जवाहरसेठ कांकरिया, सुर्यकांत महाजन, कासट गुरुजी, गंगाबिषन करवा,भारत शेटे,बद्री मानधने,भगीरथ चरखा, सुदाम चव्हाण, अभयसेठ कोटेचा,अमर डागा, दुग्गड मामाजी,सुभाष संचेती, रोटरी अध्यक्ष कृष्णा खांडे,बाळू तिवारी, छाजेड , शाम भंडारी तसेच सर्व व्यापारी प्रतिनिधी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जबरी चोरीच्या गुन्ह्यातील ४८ तासात पर्दाफाश करुन

# आरोपींच्या करमाड पोलीसांनी आवळल्या मुसक्या



तलवाडा ।प्रतिनिधी

औरंगाबाद जिल्ह्यातील पोलीस ठाणे करमाड येथील दाखल गु.र.न २१७/२०२४ कलम ३९२ भा.द.वी मधील फिर्यादी नामे अजयकुमार बेलभद्रा चव्हाण वय ४७ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर रा. गुलाबशाह इस्टेट आर/५ पत्रावाला रोड कुर्ला, ग्रेटर मुंबई यांनी दिं. ०५/०६/२०२ रोजी पोलीस ठाणे करमाड येथे फिर्यादी की, दिं.०३/०६/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा सुमारास मी स्कोडा कंपनी शेन्द्रा एम आय डी सी जवळील रोडवर लावलेले माझे ट्रकजवळ असतांना रोक रक्कम १०००/- रुपये तसेच १२०००/- रुपये किमतीचा ि- १५ कंपनीचा ५ जी मोबाईल अनोळखी इसमाने त्याचेकडे एच एफ डिलक्स मोटारसायकल वर बसुन येऊन मला धमकावुन, भिती दाखवुन, जबरदस्तीने माझेकडील वरील वर्णनाचे रोख रक्कम व मोबाईल लबाडीच्या इराद्याने हिसकावुन चोरुन घेऊन गेला आहे. वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात आरोपी शोध कामी तपास टिम नेमुन रवाना केले सदर गुन्हयातील आरोपी बाबत पोउपनि ढाकणे यांना गोपनीय बातमीदाराने खात्रीलायक बातमीदिली की सदर गुन्हा अशोक ऊर्फ मुकेश भिकाजी तरकसे रा. जालना यानेच केला आहे. व तो सद्या जालना येथे आहे अश्या माहितीवरुन मा. पोलीस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण यांचे परवानगीने सपोनि प्रताप नवघरे यांनी पाठविले उपनिरीक्षक ढाकणे,पोह.टिमकीकर हे जालना येथे गेले असता सदर आरोपी हा कन्हैयानगर जालना येथे दिसुन आला त्याने पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचा पर्यत्न केला परंतु तपास टिमने त्यास पाठलाग करुन पकडले व ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्यावरुन नमुद गुन्ह्यातील अटक करण्यात आले आहे. व गुन्हयातील मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई औरंगाबाद जिल्हा पोलिस अधीक्षक मनिष कलवानिया, अप्पर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी विजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली करमाड पोलिस स्टेशनचे सपोनि प्रताप नवघरे, उपनिरीक्षक ढाकणे, पोह. ढवळे, पोह .टिमकीकर यांनी कारवाई केली आहे. या चांगल्या प्रकारे गुन्ह्यातील तपासाचे चक्र करमाड पोलिस स्टेशनचे सपोनि प्रताप नवघरे यांनी फिरवल्याने सर्वसामान्य नागरिकांतून अभिनंदन होत आहे



# भाजप ही ६ मंत्रीपद आपल्याकडेच ठेवणार

लोकसभा निवडणुकीचा निकाला जाहीर झाल्यानंतर आता सत्तास्थापनेसाठी एनडीएकडून दावा केला गेला आहे. ९ जून रोजी नव्या सरकारचा शपथविधी होणार असून कोणाला कोणतं मंत्रीपद मिळणार याकडे सगळ्या देशाचं लक्ष लागलं आहे.

भाजप ही ६ मंत्रीपद आपल्याकडेच ठेवणार, इतर पक्षाला पाहा किती मंत्रीपद मिळणार?

दिल्लीत आज एनडीएची बैठक पार पडली. संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये झालेल्या या बैठकीत नरेंद्र मोदी यांची संसदीय पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. त्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे नेते राष्ट्रपती भवनात पोहोचले आणि त्यांनी सरकार स्थापनेचा दावा केला. आता ९ जून रोजी नव्या सरकारचा शपथविधी होणार असून त्यासाठी तयारी सुरु झाली आहे. नव्या सरकारमध्ये कोणाला कोणते मंत्रीपद मिळणार याबाबत देखील चुरस सुरू आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, भाजप सहा महत्त्वाची खाती आपल्याकडे ठेवणार आहे. ज्यामध्ये गृह, संरक्षण आणि अर्थ मंत्रालय हे भाजपकडेच राहण्याची शक्यता आहे.

कोणी काय केली मागणी

लोकसभा निवडणुकीचा निकाला जाहीर झाल्यानंतर आता निवडणूक आयोग लोकसभेच्या नवीन सदस्यांची माहिती राष्ट्रपतींना देणार आहे. त्यानंतर नवीन सरकार स्थापनेची प्रक्रिया होईल. मिळालेल्या माहितीनुसार, टीडीपीने नव्या सरकारमध्ये ४ मंत्रालयांची मागणी केलीये.

# ओबीसी बांधव आता रस्त्यावर निषेध मोर्चा शिरुर कडकडीत बंद

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड आजिनाथ खेडकर

शिरुर कासार/प्रतिनिधी

तालुका कडकडीत बंद पाळुन पंकजाताई मुंडे यांच्या वर वाईट कंमेट करणारे समाजकंटकावर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी यासाठी ओबीसी बांधव रस्त्यावर उतरून निषेध मोर्चा काढण्यात आला.ओबीसी समाजाचे नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब अमर रहे च्या घोषणा देण्यात आल्या.आजच्या येवढा ओबीसी आक्रमक कधी दिसला नाही.प्रतेकाला वाटते समाजा मधे तेढ नको भांडण नको.ईथे एकमेकांच्या शेजारी आयुष्य काढायच त्यांचा बाध माझा बांध शेजारी घराची भिंत शेजारी एका हौदात जनावरांना पाणी पाजायच एका शाळेत लेकर शिकवायची



आहेत.मग हा जातीय भेदभाव कोणी आणला आसा प्रश्न आज जनतेला पडला नेमकं जाती वाद लाऊन कोणाला पोळी भाजायची.रोज उठल की कोण जात जात करतय त्याचा बंदोबस्त होण गरजेच आहे.आता किती दिवस जनतेने त्रास सहण करायचा हा जातियवाद आता सर्वसामान्य जनतेला सहण होण्या पलिकडे गेला आहे.

# कृषिमंत्री ना.मुंडे पुन्हा कार्यरत; खरिपाच्या तोंडावर कृषी विभागाचा आढावा

परळी / प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात कृषी विभागाच्या सचिवांसह सर्व प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. यावर्षी खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरने वाढ झाली असून बियाण्यांच्या व खतांच्या पुरवठ्याबाबत सुद्धा सूक्ष्म नियोजन केले जात आहे. सध्याची एकूण बियाणे मागणी ही १८ लाख क्विंटल इतकी असुन वाढलेल्या क्षेत्राचा विचार करून राज्य शासनाने सर्व पीके मिळून २४ लाख क्विंटल बियाणे मंजूर केले आहे. त्यापैकी



१३ लाख क्विंटल वितरित केले असून आणखी ६ लाख क्विंटल वितरणाच्या स्थितीत आहे तर उर्वरित बियाणे देखील वेळेत वितरीत केले जाईल, असे नियोजन केले जात आहे.

राज्यात कुठेही बी-बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृषी सेवकापासून ते कृषी अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी डोळ्यात तेल घालून कृत्रिम टंचाई निर्माण केली जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. सर्व प्रकारचे बियाणे शेतकऱ्यांना योग्य भावात मिळावेत तसेच खतांचा मुबलक साठा व त्याचे योग्य वितरण यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्यात येईल.

बी-बियाण्यांची चढ्या भावाने विक्री, कृत्रिम टंचाई इत्यादी बाबत शेतकऱ्यांना थेट तक्रार करता यावी व विभागाला व्यक्तिशः ती तक्रार सोडवता यावी.



बीड - विठ्ठल आबा यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना माजीद मोमीन, नितीन लोखंडे, इरफान मोहम्मद, अमोल मडावी व मित्र परिवार.



## नवस फेडायला पायी चालला कार्यकर्ता बजरंग बाप्पा निवडुन येऊदे मी चालत तुळजापूर ला दर्शनासाठी येईल

केज ।प्रतिनिधी

बजरंग बाप्पा सोनवणे हे लोकसभा निवडणुकीत निवडून आल्यावर पायी तुळजापूर ला दर्शनासाठी येईल आसा नवस रवी मोरे मोरेवाडी,आश्रुबा करडे आपेगाव, गणेश घाडगे जोगाईवाडी या तीन बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वर जिवापाड प्रेम करणार्या कार्यकर्तेनी तुळजाभवानी मातेला नवस केला होता

की माझा नेता खासदार होउदे आणि खासदार झाल्यावर आम्ही चालत तुळजापूर येथे येऊन माता आई जगदंबा तुळजाभवानी मातेच दशर्न घेऊया बाबत सविस्तर वृत्त असे की नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुका या निवडणुकीत शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे आणि भाजपच्या पंकजा मुंडे या दोघा मध्ये तगडी लढत झाली, आणि शेवटच्या क्षणा पर्यंत कोणा जिंकणार आगदी शेवटच्या फेरी पर्यंत कोणालाही सांगणे शक्य नव्हते की कोण निवडून येईल आशातच बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर जिवापाड प्रेम करणारे हे त्रिमूर्ती यांनी तुळजाभवानी मातेला नवस केला की माझा नेता निवडुन आला तर आम्ही चालत तुळजापूर ला येऊ आणि सध्या पावसाचे दिवस आहेत परंतु नेत्यांच्या प्रेमाखातर कुठलीही जिवाची परवा न करता पावसाळा सुरू आहे विजाचा कडकडाट होत आहे परंतु देवीला बोलेला नवस फेडण्यासाठी चालत तुळजापूर कडे मार्गस्थ झालेले हे तीन मित्र अंबाजोगाई तालुक्यातील आपेगाव येथील आश्रुबा करडे, जोगाईवाडी येथील गणेश घाडगे,व मोरेवाडी येथील रवी मोरे यांनी निवडणुकीच्या आधी तुळजाभवानी मातेला नवस बोलला होता. विशेष म्हणजे बजरंग बप्पा निवडुन आले तर आम्ही पायी चालत तुळजापूर येथे दर्शनासाठी येऊ, असे साकडं घातलं होतं. तुळजाभवानीने हाक ऐकली यामुळे आता पायी निघालो असल्याचे या तरुणांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांना हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी जसं बळ दिलं तसेच बळ बीड जिल्ह्याचा विकास करण्यासाठी बजरंग बप्पा ला दे असे मागणेही मागणार असल्याचे या वेळी सांगितले,

# बाणेरच्या फ्लॅटमधून कुटे दांपत्य ताब्यात:कोर्टात ठेवीदारांनी केली ठेवींची मागणी, १३ जुनपर्यंत कोठडी



बीड - ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या ठेवीतील गैरव्यवहार प्रकरणी चेअरमन सुरेश कुटे, संचालक आशिष पाटोदेकर आणि अर्चना कुटे यांच्यावर जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले होते. गुरुवारी लोकसभेची आचारसंहिता संपताच बीड पोलिसांनी सायंकाळी नियोजन करत मध्यरात्री पोलिस अधिकाऱ्यांचे एक पथक पुण्याच्या दिशेने रवाना झाले.

शुक्रवार, ७ जून रोजी पहाटे पुण्यातील बाणेर येथीलकुटे यांच्या फ्लॅटमधून दांपत्याला ताब्यात घेतले. दुपारी२ वाजून ५१ मिनिटांनी त्यांना बीडच्या पोलिस अधीक्षककार्यालयात आणले. त्यानंतर ४ वाजून १० मिनिटांनीपोलिस व्हॅनमधून चेअरमन सुरेश कुटे, आशिषपाटोदकर, अर्चना कुटे यांना सायंकाळी ५ वाजून ४५मिनिटाने माजलगाव शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यातआले. पोलिसांनी कुटे यांना वैद्यकीय तपासणीसाठीमाजलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. दरम्यान,पोलिसांनी कुटे यांना माजलगाव न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने सुरेश कुटे यांना सहादिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये ६ लाख ५० हजार ठेवीदारांच्या ३ हजार कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्याने मागील आठ महिन्यांपासून ठेवीदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

चेअरमन सुरेश कुटे हे तारीख पे तारीख देत सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल करूनठेवीदारांची दिशाभूल करत होते. ठेवीदार न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणात फसवणुकीचे गुन्हे दाखलचे आदेश दिले.सुरेश कुटे यांना पोलिसांना ताब्यातघेतल्यानंतर कार्यालयात आणले,तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर कुठलाचतणाव नव्हता. पोलिस त्यांनामाजलगावला घेऊन जात होतेतेव्हाही त्यांच्या चेहऱ्यावरकसलाही तणाव दिसून आलानाही. अडीच हजार कोटी रुपयेयेणार असून आपण प्रामाणिकपणेकाम करत असल्याचे कुटे म्हणाले.गुरुवारी पोलिस अधीक्षककार्यालयात अटकेचे नियोजनझाले. रात्री अपर पोलिस अधीक्षकसचिन पांडकर, उपअधीक्षकविश्वंभर गोल्डे, स्थानिक गुन्हेशाखेचे प्रमुख पोलिस निरीक्षकसंतोष साबळे, पोलिस निरीक्षकशीतलकुमार बल्लाळ, पोलिसउपनिरीक्षक सुरेखा धस, राजूगुळभिले यांचे पथक रवाना झाले.

चेअरमन सुरेश कुटे यांच्यासह संचालक पाटोदेकरयांना सायंकाळी सहा वाजता जिल्हा न्यायाधीशदुसरे बी.जी धर्माधिकारी यांच्यासमोर हजरकरण्यात आले. या वेळी आर्थिक गुन्हा शाखेच्यापोलिसांनी न्यायालयाकडे कुटे यांना सात दिवसांचीपोलिस कोठडी सुनावण्यात यावी, अशी मागणीकेली. त्यानंतर न्यायाधीश धर्माधिकारी यांनी कुटेव पाटोदेकर यांना सहा दिवसांची म्हणजे १३जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सरकारीवकील पी.एन.मस्कर यांनी काम पाहिले.

# किल्ले रायगडावर रंगले शिवकालीन मर्दानी खेळ.काकडे महेश

पिंपळा ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पिंपळा येथील शिवशंभो मर्दानी आखाडा ता.आष्टी.जि.बीड यांनी शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक रायगडावर दाखवून शिवभक्तांचे व आलेल्या मान्यवरांचे मन जिंकली.छत्रपती.संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते सर्व कलाकारांचे स्वागत केले.व छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५० वा शिव राज्याभिषेक सोहळा सहा जून रोजी पार पडला.त्यामध्ये देशातील विविध मर्दानी आखाड्यांना छत्रपती संभाजीराजे भोसले व महाराणी संयोगिता राजे भोसले यांनी सार्वजनिक शिवराज्यभिषेक समिती भारत तर्फे आखाड्यांना आमंत्रित करण्यात आले होते.बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील पिंपळा या गावातील शिवकालीन मर्दानी आखाडा यांनी



रायगडावरच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन आपल्या गावाची व आपल्या भागाचे नाव रायगडाच्या मातीमध्ये लिहून ठेवण्याचे काम या ठिकाणी सर्व कलाकारांनी केली आहे.त्यामध्ये सर्वांनी आपली प्रात्यक्षिके सादर करत त्यात लाठी.काठी, दांडपट्टा, तलवारबाजी, हरी.गदगा,पटकाप अशा प्रकारची शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.यामध्ये बीड जिल्ह्यातील शिवशंभु मर्दानी आखाडा पिंपळा ता.आष्टी जि.बीड.यांनी शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक दाखवून रायगडावर आलेल्या सर्व मावळ्यांचे मने जिंकले.शिवकालीन मर्दानी आखाडा यांचे सर्व मुले व मुली. खालील प्रमाणे कु.साक्षी सोनवणे.कु.साक्षी अरुण.कु.सृष्टी काकडे.कु.प्रतीक्षा निपुंगे.कु.यश भिटे.कु.कार्तिक लोखंडे.आदी कलाकारांनी यामध्ये भाग घेतला होता.या सर्वांना मार्गदर्शन करणारे वस्ताद.आनंद वाघ.शिवशंभु मर्दानी आखाड्याचे वस्ताद.महेश काकडे

शिवशंभू मर्दानी आखाड्याचे बीड जि.अध्यक्ष.दादा विधाते.पत्रकार.युवराज खटके.शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक दाखवून रायगडाच्या पायरीवर आपल्या बीड जिल्ह्याचे नाव कोरत पराक्रम गाजवला.अशाप्रकारे शिवकालीन मर्दानी आखाडा यांनी आपली कला ही रायगडावर गाजवली आणि रायगडावरील समितीच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# गोवर्धन कोळेकर यांना राष्ट्रपतीचे विरता पदक प्रदान

नांदेड ।संजीवकुमार गायकवाड

२०१८ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या एका जातीय दंगलीत अत्यंत धिरोदात्तपणे लोकांचे जिव वाचविण्यात दाखवलेल्या शौर्यासाठी सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक गोवर्धन धनाजी कोळेकर यांना जाहिर झालेले राष्ट्रपती पदक महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी प्रदान केले.गोवर्धन कोळेकर अत्यंत नामांकित पोलीस अधिकारी आहेत. नांदेड जिल्ह्यात सुध्दा त्यांनी भरपूर कामगिरी केली आहे.

दि.१५ ऑगस्ट २०२१ रोजी भारताचे राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांनी त्यावेळी देशातील अनेक पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर केले. त्यात एक नाव पोलीस उपअधिक्षक या पदावरून छत्रपती संभाजीनगर शहरातून सेवानिवृत्त झालेले गोवर्धन धनाजी कोळेकर यांचे नाव सुध्दा होते.त्यांनी सन २०१८ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या एका जातीय दंगलीमध्ये स्वत:च्या जिवाची परवा न करता जनतेच्या रक्षणासाठी दाखवलेले शौर्य राम नाथ कोविंद यांनी मान्यता देत त्यांना विरता पदक प्रदान केले आहे.काही कारणांनी बरेच राष्ट्रपती पद वाटप करण्यासाठी उशीर झालेला होता.त्याचा समारोह ६ जून रोजी मुंबईच्या राज्यपाल भवनात पार पडला.सध्याचे राज्यपाल रमेश बैस यांनी गोवर्धन धनाजी कोळेकर यांना त्यांचे विरता पदक प्रदान केले. गोवर्धन कोळेकर हे १९८३ मध्ये पोलीस दलात भरती झाले होते आणि सन २०१९ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे




पोलीस उपअधिक्षक असतांना सेवानिवृत्त झाले.सध्या गोवर्धन कोळेकर हे छत्रपती संभाजीनगर येथेच राहतात.गोवर्धन कोळेकर यांनी नांदेड जिल्ह्यात धर्माबाद, देगलूर या पोलीस ठाण्यासह इतरही अनेक पोलीस ठाण्यात पोलीस निरिक्षक म्हणून कार्यभार सांभाळलेला होता. नांदेड जिल्ह्यात काम करतांना ते उत्कृष्ट अधिकारी म्हणून प्रसिध्द होते.आपल्या सेवाकाळात सुध्दा त्यांनी बरीच पदके मिळवली होती.

दिनांक ११ मे २०१८ रोजी छत्रपती संभाजी नगर शहरातील सिटी चौक पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या मोती कारंजा भागात दोन गटात दंगल उसळली. अत्यंत मोठा जमाव दोन्ही बाजूने जमला होता आणि एकमेकांवर दगडफेक करत होता.

त्यावेळी गोवर्धन कोळेकर यांनी आपल्या जीवाची परवा न करता त्या दंगलीत शिरून जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला.परंतु जमावाने केलेल्या दगड फेकीतील एक दगड त्यांच्या गळ्यावर जोरदारपणे लागला. तरी आपल्या गळ्याला रुमाल बांधून कोळेकर यांनी त्यावेळी काम केले.पण त्यांना लागलेला दगड आणि त्यामुळे झालेली जखम एवढी भयंकर होती की त्यांना एअर म्बुलन्सने मुंबई येथे उपचारासाठी पाठवण्यात आले होते.आपले कर्तव्य बजावताना मोठ्या जमावत घुसून शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात त्यांना लागलेल्या दगडामुळे त्यांचा आवाज कायमस्वरूपी बदलला आहे.तसेच त्यांचा डावा हात शक्तीहीन झाला आहे या शौर्याची दखल घेऊन त्यांना शौर्य पदक प्रदान करण्यात आले आहे नांदेड जिल्ह्यात सुद्धा गोवर्धन कोळेकर यांचे अभिनंदन होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT